NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

**अत्यावश्यक आरोग्य सेवा**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, धाराशिव**

Website: http://mahatenders.gov.in,

# e -Tender Supply of

# १५ वा वित्त आयोग अंतर्गत शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र करीता अकुशल (**Attendant/ Guard व Cleaning Staff**) कंत्राटी पदे बाहयस्त्रोताद्वारे भरण्याकरीता ई- निविदा

निविदा संदर्भः ई-निवीदा क्र.०१/NHM/१५ वा वित्त आयोग /बीएफओ/२०२४-२५

निविदा धारकाचे नावः.........................................................................................

ई निविदा सुचना

**अत्यावश्यक आरोग्य सेवा**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, धाराशिव.**

निविदा संदर्भः ई-निवीदा क्र.०१/NHM/ १५ व्या वित्त आयोग /बीएफओ /२०२४-२५

**राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,जिल्हा परिषद,धाराशिव.** आरोग्य संस्थामध्ये निर्माण करण्यात आलेले अकुशल कंत्राटी पदे बाहयस्त्रोताद्वारे भरण्याकरीता दोन लिफाफा पद्धतीने पात्र व इच्छुक निविदाधारकाकडून निविदा मागवित आहेत.

कामाचा तपशिल

| अ.क्र. | कामाचे वर्णन | कालावधी | कामाची अंदाजीत रक्कम | ई निविदा फॉर्मची किंमत | बयाना रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अकुशल कंत्राटी (**Attendant/ Guard, व Cleaning Staff** ) पदे बाहयस्त्रोताद्वारे घेणे. | १ वर्ष | Rs. १,९९,०२,००० /- वार्षीक ई निविदा (अक्षरी- एक कोटी नव्यानव्व लाख दोन हजार फक्त) | Rs. २०,०००/- | Rs. २००,००० /- |

वरील अकुशल कंत्राटी पदे बाहयस्त्रोताद्वारे पद्धतीने पुरविण्याकरिता मान्यताप्राप्त व इच्छुक कंत्राटदाराकडुन दोन लिफाफा पद्धतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत. नियम व अटी पुर्ततेसह आपली ई निविदा http: //mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन दिनांक१५/०८/२०२४ ते दि०२/०९/२०२४ (सायं. 6.15 वाजेपर्यंत) किंवा त्यापुर्वी डाऊनलोड करावयाचे आहेत.

ई निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये २०,०००/- चा (नापरतावा) फी व बयाना (EMD) रक्कम रु. २००,००० /- (अक्षरी रुपये - दोन लक्ष रुपये फक्त) **District Integrated Health & F.W.Society Osmanabad – Statutory Deduction "Indian bank osmanabad A/c No.7169695239 IFSC Code-IDIB000O515 (8th Letter is O ' in word)** या नावांने **RTGS/NEFT/IMPS** जमा करण्यात यावेत. Demand Draft स्विकारला जाणार नाही.

निविदा अर्ज (प्रपत्र-१,१ ब) अनुभव प्रमाणपत्र (प्रपत्र-२), वार्षिक उलाढाल(प्रपत्र-३), शपथपत्र (प्रपत्र-४), मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र (प्रपत्र-६),फर्म तपशिल (प्रपत्र-७), व तांत्रीक लखोट्यात मागणी केलेली सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह सदरची निविदा http: //mahatenders.gov.in संकेत स्थळावर भरावयाच्या आहेत.

निविदा पुर्व बैठक दिनांक२१/०८/२०२४ वेळ सकाळी 11.00 वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. धाराशिव यांच्या दालनात आयोजित करण्यात आलेली आहे. निविदा (तांत्रिक लिफाफा) उघडण्याची बैठक दिनांक ०/०६/२०२४ रोजी वेळ दु. 12.00 वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. जर काही तांत्रिक कारणास्तव निविदा न उघडल्यास दुस-या दिवशी किंवा इतर दिवशी उघडण्यात येतील. सदर निविदे प्रक्रियेचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

| Name of Tender | Period of Sale & Preparation of Bid | Closing of Bid | Date of Hard Copy Submission to Office | Bid Opening Envelop no.१ |
|---|---|---|---|---|
| अकुशल कंत्राटी पदे बाहयस्त्रोताद्वारे पुरविणे | २१/०८/२४ सकाळी १६०० ते ---- 02/09/2024 सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत | ०२/०९/२४ सायं.६.१५ वाजेपर्यंत | ०३ /०९/२४ सायं.६.१५ वाजेपर्यंत | ०४/०९/२४ रोजी दु. १२.०१ वाजे नंतर |

सदरची निविदा http: //mahatenders.gov.in, संकेत स्थळावर भरावयाच्या आहेत.



Scanned with OKEN Scanner

निवीदेसाठी पात्रतेचे निकषः-

१) निविदाधारकाची मागील तीन (सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४ ) वर्षाची दरवर्षी वार्षिक उलाढाल रक्कम रु.- १,००,००,०००/- (अक्षरी रुपये - एक करोड फक्त) किंवा त्यापेक्षा जास्त असलेले चार्टर्ड अकाउंटंट यांचे कडुन प्रपत्र-३ नुसार (UIDN क्रमांकासह) प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे.

२) मागील तीन वर्षाचा( वित्तीय वर्ष सन सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४) ऑडिट रिपोर्ट (बॅलन्सशीट (ताळेबंद), नफा-तोटा प्रॉफिट व लॉस्ट स्टेटमेंट) ची प्रत.

३) आवश्यक निविदा शुल्क व बयाना रक्कम भरणे बंधनकारक आहे.निविदाकारांना निविदे सोबत निविदा फी रु.२०,०००/- (अक्षरी रुपये - वीस हजार रुपये फक्त) नापरतावा व बयाना/अनामत रक्कम (EMD) रक्कम रु. २००,००० /- (अक्षरी रुपये - दोन लाख फक्त ) MSME असल्यास फक्त ईएमडी मध्ये सुट परंतु टेंडर फीस भरावी लागेल.

४) दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत किंवा सहकारी संस्था अधिनियमांतर्गत किंवा कोणत्याही अस्तित्वात असलेल्या अधिनियमांतर्गत त्या त्या वेळी नोंदणी झाल्याचे नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासनाच्या कोणत्याही विभागाकडे अथवा उपक्रमांकडे नोंदणी केलेले अद्यावत वैध नोंदणी प्रमाणपत्र ( सदर प्रमाणपत्रावर मनुष्यबळ पुरविणे उल्लेख असणे आवश्यक आहे.)

५) कामगार कायदयातील तरतुदीनुसार संस्थेचे कामगार कायदयातील अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र ( लेबर लायसन्स) आवश्यक.(किमान २५ कामगारांची नोंद असणारे तसेच वैध असणारे)

६) GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र. GSTR 3B प्रमाणपत्र ३१/३/२४

७) वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र (PAN)

८) आयकर विवरण पत्र दाखल केल्याचे ITR-V (मागील तीन वर्षाचे (सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४)

९) व्यवसाय कर प्रमाणपत्र व मागील तीन वर्षात व्यवसाय कर भरलेली प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१०) निविदाकारास मागील तीन वर्षात अकुशल मनुष्यबळ सेवा पुरविल्याचे संस्थाचे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत अथवा वैद्यकीय क्षिक्षण विभाग अतंर्गत असलेल्या रुग्णालयामधील कामाचा अनुभव असलेल्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

११) निविदाकाराने मागील तीन वर्षात अकुशल मनुष्यबळ सेवा पुरविल्याचे संस्थाचे अनुभव प्रमाणपत्र. ( केंद्रीय अथवा राज्यस्तरीय शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये मागील तीन वर्षातील कार्यारंभ आदेश व समाधानकारक रित्या काम पुर्ण केल्याचे अथवा चालु असल्याचे त्या संस्थेचे प्रमाणपत्र, हे काम या ई निविदेच्या स्थुल रकमेच्या २५ % मागील तीन अर्थिक वर्षात दरवर्षी वार्षिक झालेले असण्याबाबतचे प्रमाणपत्र प्रपत्र -२ नुसार)

१२) किमान ५०अकुशल कामगारांच्या नावाची प्रत आवश्यक

१३) राज्य कामगार विमा योजना(ESIC) बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१४) निविदाकाराने कमीत कमी ५० कामगारांची गत वर्षात ESIS/ESIC हप्ता जमा केलेली ऑनलाईन कामगारांच्या नावाची प्रत आवश्यक आहे.

१५) भविष्य निर्वाह निधी (PF) नोंदणी प्रमाणपत्र आणी किमान ५० कामगारांचा भविष्य निर्वाह निधीचा हप्ता माहे ०१ April २०२३ ते ३१ March २०२४ पर्यंत भरलेल्या चलनाची प्रत.

१६) केंद्रीय अथवा राज्य कामगार विमा योजना (ESIC) नोंदणी प्रमाणपत्र आणी किमान ५० कामगारांसाठी आवश्यक असलेली फी माहे ०१ April २०२३ ते ३१ March २०२४ पर्यंत भरलेल्या चलनाची प्रत.

१७) चालु आर्थीक वर्षातील भरणा केलेल्या चलनाची प्रत असणे आवश्यक आहे.

१८) निविदाधारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबत निविदाकारने शपथपत्र / प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (प्रपत्र-४ Affidavit करुन)

१९) सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत, संस्थाना निविदा भरावयाची असल्यास त्यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे अनुमती पत्र जोडणे आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

२०) निविदाकारांकडुन नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना मंजूर केलेल्या दरानुसार वेतन अदा करणे बंधनकारक राहील.वेळोवेळी त्यामध्ये झालेल्या सुधारणे नुसार कर्मचाऱ्यांना वेतन देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. वाढीव दराबाबत वेगळ्याने दर मंजुर केले जाणार नाही.

२१) ईएमडी मध्ये सुट हवी असल्यास MSME प्रमाणपत्र आवश्यक आहे. टेंडर फीस भरावी लागेल.

२२) निविदाकारांकडुन नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१८/प्र.क्र. ३२८/आरोग्य-३ दि.१७.०३.२०२० मध्ये मंजूर केलेल्या दरानुसार वेतन अदा करणे बंधनकारक राहील.वेळोवेळी त्यामध्ये झालेल्या सुधारणे नुसार कर्मचाऱ्यांना वेतन देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. वाढीव दराबाबत वेगळ्याने दर मंजुर केले जाणार नाही.

२३) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज संस्था, शासन अंगिकृत महामंडळे इत्यादी संस्थामध्ये अकुशल मनुष्यबळ सेवा पुरवठा केलेला ठेकेदार पात्र ठरु शकतात.

२४) काही तांत्रीक अडचणी मुळे निविदा नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार, **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव** यांनी राखुन ठेवलेला आहे.

२५) सदरील ई-निविदा ही २ वर्ष कालावधीसाठी राहील. **नवीन निविदा होईपर्यंत याच दरावर सेवा पुरवठा चालु ठेवणे बंधनकारक राहील.**

टिप :- निविदाकारवर दखलपात्र गुन्हा नसावा तसेच निविदाधारक यापुर्वी सदरची सेवा देत असताना सेवा घेणाऱ्या संस्थेकडुन संबंधित निविदाकारवर अव्यवहार्य सेवा दिल्याबाबत या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास अथवा निविदाधारक शासकीय अथवा निमशासकीय संस्थेच्या काळ्या यादीत सामाविष्ट झाल्यास/ असल्यास सदरील निविदा असेल त्या स्तरावर रद्द करण्यात येईल.

(डॉ. एस. एल. हरिदास)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, धाराशिव.



Scanned with OKEN Scanner

निविदा भरताना निविदाधारकांस येणाऱ्या खर्चाबाबत :-

निविदा सादर करताना येणाऱ्या सर्व खर्चाची संपुर्ण जबाबदारी ही निविदाकारावर असेल. याबाबत निविदाकारास प्रतिपुर्ती हक्क सांगता येणार नाही. तसेच सदरची निविदा प्रक्रिया रद्द झाल्यास अथवा निविदाकाराची निविदा नामंजुर केली गेल्यास सदरच्या निविदेकरिता झालेल्या खर्चाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. दि. ०१ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार खरेदी नियम पुस्तिका ६.८ परिशिष्ट-८ बयाना रक्कम १) सुक्ष्म व लघु मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना टेंडर फीस भरावी लागेल व बयाना रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात आली आहे. २) शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांना तसेच सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात यावी.यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील.

निविदा प्रक्रियेबाबतचे स्पष्टीकरण :-

निविदा प्रक्रियाबाबत काही शंका किंवा तक्रारी असल्यास संबंधित निविदाकाराने अथवा निविदा भरु इच्छीणाऱ्या निविदाकांरानी सदरची शंका अथवा तक्रार निविदा भरण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी या कार्यालयाकडे लेखी अथवा ई-मेल द्वारा सादर करावी. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदरच्या कोणत्याही तक्रारी अथवा शंका विचारात घेतल्या जाणार नाही.

कार्यालयाचा पत्ताः- **एनएचएम कक्ष, हॉल नं. २१८ जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव**

Email:- nrhmdpmosmanabad@gmail.com

निविदे प्रक्रियेतील बदलाबाबत :-

१) सक्षम प्राधिकारी हे निविदेमध्ये काही बदल करावयाची असल्यास सदरच्या निविदेची अंतिम दिनांक वेळेपुर्वी शुद्धीपत्रकाद्वारे बदल करु शकतात.
२) शुद्धीपत्रकाद्वारे निविदा मधील बदल हे ग्राह्य मानले जातील. व सदरचे बदल हे निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहतील.
३) प्रसिद्ध केलेल्या शुद्धीपत्रकामुळे निविदा सादर करण्यास अतिरिक्त कालावधी वाढविण्याचा हक्क सक्षम प्राधिकरणाने राखुन ठेवला आहे. याबाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावरुन प्रसिद्ध केली जाईल. व ती माहीती भरु इच्छिणाऱ्यांना लागु होईल.

निविदा सादर करण्याबाबत :-

ई-निविदा ह्या विहित मुदतीत दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत. लखोटा क्र.१ तांत्रीक लखोटा व लखोटा क्र.२ व्यापारी लखोटा आहेत.तांत्रीक लखोट्यातील कागदपत्रांची पुर्तता न केल्या गेल्यास व्यापारी लखोटा उघडण्यात येणार नाही. व अशा निविदाधारकांची निविदा नामंजुर करण्यात येईल. व ई-निविदा प्रक्रियेतुन त्यांना बाद करण्यात येईल.

उशीराने प्राप्त झालेल्या निविदाबाबत

उशीराने प्राप्त झालेल्या निविदा नाकारण्यात येतील तसेच उशीरा सादर केलेल्या निविदा बाबतचे कोणतेही कारण किंवा सबब ग्राह्य मानले जाणार नाही. उदा.Electricity/Server down Internet/Etc. याबाबत निविदाकारस कोणतीही तक्रार करता येणार नाही. अथवा केलेली तक्रार विचारात घेतली जाणार नाही.



Scanned with OKEN Scanner

लखोटा क्र.१ तांत्रिक लखोटा

तांत्रिक लखोट्यामध्ये खालील कागदपत्रांची स्वयंसाक्षांकित प्रमाणपत्रापैकी कोणत्याही एक अथवा अनेक दस्ताऐवज सादर केलेले नसेल आणि सादर केलेले दस्ताऐवज वाचनिय नसल्यास,योग्य प्रमाणपत्र प्रिंट येत नसेल अथवा खुप काही प्रिंट येत असेल तर संबंधीत निविदाकाराची निविदा बाद केली जाईल.(Please do not upload foggy documents), खाली दिलेल्या अनुक्रमाकांनुसारच पृष्ठांकित करुनच कागदपत्रे Scan करुन सादर करावेत. (Please upload the documents as below given serially in singale pdf file) अनावश्यक कादपत्रे जोडु नयेत. उदा.सदरील निविदाफॉर्मची छायांकीत प्रत जोडु नये

१) निविदाधारकाची मागील तीन (सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४ ) वर्षाची दरवर्षी वार्षिक उलाढाल रक्कम रु.- १,००,००,०००/- (अक्षरी रुपये - एक करोड फक्त) किंवा त्यापेक्षा जास्त असलेले चार्टर्ड अकाउंटंट यांचे कडुन प्रपत्र-३ नुसार (UIDN क्रमांकासह) प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे.

२) मागील तीन वर्षाचा( वित्तीय वर्ष सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४) ऑडिट रिपोर्ट (बॅलन्सशीट (ताळेबंद), नफा-तोटा प्रॉफिट व लॉस्ट स्टेटमेंट) ची प्रत.

३) आवश्यक निविदा शुल्क व बयाना रक्कम भरणे बंधनकारक आहे.निविदाकारांना निविदे सोबत निविदा फी रु. २०,०००/- (अक्षरी रुपये - वीस हजार फक्त) नापरतावा व बयाना/अनामत रक्कम (EMD) रक्कम रु. २००,००० /- (अक्षरी रुपये - दोन लाख फक्त) MSME असल्यास फक्त ईएमडी मध्ये सुट परंतु टेंडर फीस भरावी लागेल.

४) दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत किंवा सहकारी संस्था अधिनियमांतर्गत किंवा कोणत्याही अस्तित्वात असलेल्या अधिनियमांतर्गत त्या त्या वेळी नोंदणी झाल्याचे नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासनाच्या कोणत्याही विभागाकडे अथवा उपक्रमांकडे नोंदणी केलेले अद्यावत वैध नोंदणी प्रमाणपत्र ( सदर प्रमाणपत्रावर मनुष्यबळ पुरविणे उल्लेख असणे आवश्यक आहे.)

५) कामगार कायदयातील तरतुदीनुसार संस्थेचे कामगार कायदयातील अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र ( लेबर लायसन्स) आवश्यक.(किमान ५० कामगारांची नोंद असणारे तसेच वैध असणारे)

६) GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र , GSTR ३B प्रमाणपत्र ३१/३/२४

७) वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र (PAN)

८) आयकर विवरण पत्र दाखल केल्याचे ITR (मागील तीन वर्षाचे ( सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४)

९) व्यवसाय कर प्रमाणपत्र **नोंदणी**.

१०) निविदाकाराने मागील तीन वर्षात अकुशल मनुष्यबळ सेवा पुरविल्याचे संस्थाचे अनुभव प्रमाणपत्र. ( केंद्रीय अथवा राज्यस्तरीय शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये मागील तीन वर्षातील कार्यारंभ आदेश व समाधानकारक रित्या काम पुर्ण केल्याचे अथवा चालु असल्याचे त्या संस्थेचे प्रमाणपत्र, हे काम या ई निविदेच्या स्थुल रकमेच्या २५ % मागील तीन अर्थिक वर्षात दरवर्षी वार्षिक झालेले असण्याबाबतचे प्रमाणपत्र प्रपत्र -२ नुसार)

११) राज्य कामगार विमा योजना(ESIC) बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१२) निविदाकाराने कमीत कमी ५० कामगारांची गत वर्षात ESIS/ESIC हप्ता जमा केलेली ऑनलाईन कामगारांच्या नावाची प्रत आवश्यक आहे.

१३) भविष्य निर्वाह निधी (PF) नोंदणी प्रमाणपत्र आणी किमान २५ कामगारांचा भविष्य निर्वाह निधीचा हप्ता माहे ०१ April २०२३ ते ३१ March २०२४ पर्यंत भरलेल्या चलनाची प्रत.

१४) केंद्रीय अथवा राज्य कामगार विमा योजना (ESIC) नोंदणी प्रमाणपत्र आणी किमान ५० कामगारांसाठी आवश्यक असलेली फी माहे ०१ April २०२३ ते ३१ March २०२४ पर्यंत भरलेल्या चलनाची प्रत.

१५) निविदाधारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबत निविदाकारने शपथपत्र / प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (प्रपत्र-४ Affidavit करुन)

१६) सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत, संस्थाना निविदा भरावयाची असल्यास त्यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे अनुमती पत्र जोडणे आवश्यक आहे.

१७) शासन नियमानुसार निविदाकारांकडुन आलेले दर हे **किमान वेतनानूसार असले बाबत हमीपत्र.**



Scanned with OKEN Scanner

१८) ईएमडी मध्ये सुट हवी असल्यास MSME प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक.

१९) खरेदी प्राधिका'यासोबत हितसंबंधाबाबत संघर्ष नसल्याबाबतचे हमीपत्र (प्रपत्र-८ नुसार सादर करावे.)

**वरील** प्रमाणे कागदपत्रे हे तांत्रिक लिफाम्यामध्ये जोडणे आवश्यक आहे.

लखोटा क्र.२-व्यापारी लखोटा :-

०१. व्यापारी लखोटा प्रपत्र क्र. ५ मध्येच भरुन सादर करावा. (ऑनलाईनपध्दतीने) प्रपत्र ५ वरील दर हे अंतिम राहतील सदरच्या दरावरच लखोटा क्र.२ चे मुल्यमापन केले जाईल.

०२. व्यापारी लखोटा क्र.५ सादर करणे बंधनकारक आहे.

०३. निविदेतील प्रपत्र .५ वर दरनिश्चितकरावे. (ऑनलाईनपध्दतीने)

**निविदा सादर करणे विषयी अंतिम तारीख :-**

निविदा धारकानी परिपुर्ण निविदा विहीत कालावधीत संकेतस्थळावरुन ऑनलाईन सादर करावयाची आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाने निविदा सादर करण्याचा कालावधी शुद्धिपत्रकाद्वारे वाढिवला असल्यास अथवा बदल केलेल्या अटी व शर्ती वगळता पूर्वीच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती त्याच लागु राहतील.



Scanned with OKEN Scanner

**लखोटा क्र.१ चा लखोटा उघडण्याबाबत :-**

लखोटा क्र. १ तांत्रीक लखोटा हा दिनांक ०१ डिसेंबर २०१६ रोजीच्या उद्योग,उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील सुचनेनुसार गठित केलेल्या समिती समोर निविदाकारच्या उपस्थितीत अथवा अनुपस्थितीत उघडण्यात येईल. तांत्रिक लखोटा ऑनलाईन पद्धतीने उघडतांना निविदाकारस अथवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल. निविदाकारची उपस्थिती ऐच्छिक राहील.लखोटा क्र.१ मधील सर्व कागदपत्राचीं तपासणी समितीमार्फत केली जाईल. तसेच समितीने घेतलेला निर्णय अथवा अटी व शर्ती केल्यास त्या निविदाधारकांना बंधनकारक राहतील तसेच याबाबतचा पुर्ण अधिकार समितीस राहतील.

सदरची निविदा प्रक्रिया ही दोन लिफाफा पद्धतीने आहे. लखोटा क्र.१ तांत्रीक लखोट्याची छाननी झाल्यानंतर स्पर्धेकरिता लखोटा क्र.१ चे कमीत कमी तीन लखोटे पात्र ठरले तरच सदर दिवशी अथवा पुढिल दिवशी लखोटा क्र.२ (व्यापारी लखोटा) उघडला जाईल अथवा लखोटा क्र.१ पात्र ठरलेल्या निविदाकारकडुन सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी (कार्यालयास आवश्यकता वाटल्यास) चार्टर्ड अकाउंटट यांचेकडुन करुन घेऊन लखोटा क्र.२ (व्यापारी लखोटा) उघडण्याबाबत निविदाधारकांना कळविले जाईल. तांत्रिक लखोट्यामध्ये मागणी केलेली सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत. कमी कागदपत्रांचा लखोटा अथवा चुकीची कागदपत्रे सादर केलेला लखोटा नामंजुर करण्यात येईल. व या बाबत निविदाकारस तक्रार करता येणार नाही.

**निविदेचा वैधता कालावधी**

निविदेचा वैधता कालावधी हा १८० दिवसाचा राहिल.अपवादात्मक परिस्थीतीमध्ये १८० दिवसापेक्षा जास्त राहणार नाही.

**निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदाधारकांच्या तक्रारी बाबत.**

निविदा प्रक्रियेमध्ये निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकांवर तक्रार करणाऱ्या तक्रार दारास रु.५०,०००/- इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे (**District Integrated Health & F.W.Society Osmanabad – Statutory Deduction** या नावांने ) डि.डि.(Demand Draft) जमा करावी लागेल जर तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित तक्रारदाराची अनामत रक्कम परत करुन आरोप सिद्ध झालेल्या निविदाकारस निविदा प्रक्रियेतुन वगळण्यात येऊन त्याची बयांना / अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

बयाना रक्कम

१. निविदा शुल्क रु.२०,०००/- (अक्षरी रुपये- वीस हजार फक्त) नापरतावा व बयाना/अनामत रक्कम(EMD) रु. २००,००० /- (अक्षरी रुपये- दोन लाख फक्त) सदर दोन्ही रक्कमा **District Integrated Health & F.W.Society Osmanabad – Statutory Deduction "Indian bank osmanabad A/c No.7169695239 IFSC Code-IDIB000O515 (8th Letter is O ' in word)**या नावांने **RTGS/NEFT/IMPS** पध्दतीने जमा करावी.

२. नामंजुर करण्यात आलेल्या निविदाकारची बयाना रक्कम ३० दिवसात परत करण्यात येईल. तसेच निविदाधारकांना बयाना रकमेचे कोणतेही व्याज दिले जाणार नाही. अथवा निविदाधारक व्याजाची मागणी करु शकणार नाहीत. काही तांत्रिक व अपरिहार्य कारणास्तव ३० दिवसाचा बयाना रक्कम परत करण्याचा कालावधी वाढु शकेल. त्यासाठी सुध्दा व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

३. बयाना रक्कम जप्त करणे बाबत

अ) निविदाधारक आपला वैधता कालावधी पुर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा कार्यालयास याबाबत निविदाधारकांनी लेखी कळविले गेल्यास

आ) कंत्राट निश्चित केलेल्या निविदा धारकाने रु. १००/- स्टॅंपपेपर वर करारपत्र न दिल्यास अथवा सुरक्षा अनामत किंवा बॅंक सेक्युरिटी या कार्यालयाकडे ३० दिवसाच्या आत जमा न केल्यास बयाना रक्कम जप्त केली जाईल व त्याबाबत निविदाकारस तक्रार करता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

निविदेचे मुल्यमापन

१) गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत तांत्रीक लखोट्यातील आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली जाईल.

२) निविदाधारक पात्रतेचे सर्व निकष, निविदाकारची ऐपत, निविदा कालावधी पुर्ण करण्याबाबतची क्षमता याबाबतची छाननी निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे समिती ठरवेल.

३) निविदाकारकडुन निविदा सादर करतांना गफला केला आहे काय? अथवा सादर केलेल्या निविदा निविदाधारकांनी परस्परांच्या संगनमताने सादर केल्या आहेत काय? याची शहानिषा समितीमार्फत केली जाईल. व त्यामध्ये तथ्य आढळुन आल्यास अशा.निविदाधारकास निविदा प्रक्रियेतुन रदद करण्यात येईल.

४) निविदाधारकांनी सादर केलेली निविदा परिपुर्ण असणे आवश्यक आहेत. अपुर्ण कागदपत्राच्या निविदा नामंजुर करण्यात येतील. व सदरच्या निविदांचा व्यापारी लखोटा फोडण्यात येणार नाही. तसेच, निविदाधारक आपल्या निविदेची स्थिती संकेतस्थळावर पाहु शकतात.

५) ज्या निविदाकारचा लखोटा क्र.१-तांत्रीक लखोटा परिपुर्ण असेल त्याच निविदाकारचा लखोटा क्र.२ (व्यापारी लखोटा) उघडण्यास पात्र ठरतील. पात्र ठरलेल्या निविदाधारकांना लखोटा क्र.२ उघडण्या बाबत वेळ व दिनांक कळविला जाईल. अथवा सदर निविदेस स्पर्धा होत नसल्यास निविदेमधील अटी व शर्ती शिथील करण्याचा अधिकार समितीस राहील.किंवा निविदा सादर करण्याचा कालावधी वाढविण्याचा अधिकार समितीस राहील. या बाबत निविदाधारकांस तक्रार करता येणार नाही.

६) निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांची तपासणी मुल्यमापनाचे आवश्यक ते निकष लावतील. व ते सर्व निकष निविदाधारकांना बंधन कारक राहतील.

**कुशल/अकुशल मनुष्यबळ पुरविणे या सेवेची अनामत :-**

ज्या निविदाधारकांची निविदा मंजुर होईल. त्या निविदाकारने मनुष्यबळ पुरविणे अनामत रक्कम आदेशाच्या मुल्याच्या ३% कार्यालयाकडे १५ दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. असे न झाल्यास निकालाची अधिसुचना / पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील. अनामत रकमेचा धनाकर्ष RTGS/IMPHS/NEFT द्वारे **<u>District Integrated Health & F.W.Society Osmanabad – Statutory Deduction</u> "Indian bank osmanabad A/c No.7169695239 IFSC Code-IDIB000O515 (8th Letter is O ' in word)** च्या खातेवर भरणा करण्यात यावा व त्यांचे पत्र तपशिल सहीत सादर करावे अथवा बँक गॅरंटी प्रपत्र-७ नुसार सादर करावी लागेल. सदरची रक्कम ही निविदाधारकांनी कार्यालयास सादर केलेल्या एकुण दराच्या ३ % इतकी असेल. महाराष्ट्र स्थित आणि DGS & D आणि महाराष्ट्र शासनाचे शासकीय व अर्धशासकीय संस्था, महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, केंद्र, राज्य शासनाचे पुर्ण मालकीचे उपक्रम, केंद्र शासनाच्या ऑईल कंपन्या तसेच, NSIC/NSMEDIS या अंतर्गत नोंदणीकृत संस्थांना पुरवठा आदेशाच्या २% अनामत रक्कम देणे बंधन कारक राहील. तसेच निविदाधारकांनी रु. १००/- च्या स्टँप पेपर वर करार करुन देणे बंधन कारक आहे. कंत्राटदाराने त्याला दिलेल्या कामाचा ठेका त्याने व्यवस्थित रित्या पुर्ण केला नसल्यास अथवा संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई अगर नुकसान भरपाई करणे आवश्यक असल्यास तसेच सक्षम प्राधिकरणाने संबंधित ठेकेदाराची सेवा योग्य नसल्याबाबत कळविल्यास संबंधित ठेकेदाराची अमानत रक्कम जप्त करण्यात येईल. कंत्राट दाराने त्याला दिलेल्या कामाचा ठेका त्याने व्यवस्थीत पुर्ण केल्यानंतर व संबंधीत ठेकेदारावर दंडात्मक कारवाई अगर नुकसान भरपाई नसल्यास तसेच सक्षम प्राधिकरणाने काम समाधानकारक पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतर अथवा पुरवठा आदेशात नमुद केलेल्या वॉरंटी कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत करण्यात येईल. अनामत रक्कम परत करण्यासाठी काही कारणाने विलंब झाल्यास त्यास व्याज अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, वॉरंटी कालावधी दरम्यान सुद्धा व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

<u>निविदा कालावधी साठी मुदतवाढ बाबत.</u>

तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास

- प्रथम ०१ आठवड्याची मुदतवाढ.
- दुसऱ्यांदा ०१ आठवड्याची मुदतवाढ
- त्यानंतर मुदवाढ देण्यात येणार नाही. परंतु वरिष्ठ कार्यालयाच्या विशेष परवानगीने मुदतवाढ देणे बाबत निर्णय घेण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

**निविदेच्या गोपनियतेबाबत :-**

निविदाकाराने सादर केलेल्या कागदपत्राची तपासणी झाल्या नंतर सदर बाबतीत स्पष्टीकरण व दरांचा तुलनात्मक तक्ता,समितीच्या शिफारसी तसेच,निविदा प्रक्रियेबाबतची कोणतीही माहिती निविदाधारकांस अथवा जे निविदा प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत अशा कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस देता येणार नाही अथवा याबाबत हक्क सांगता येणार नाही. तसेच, निविदेच्या अनुषंगाने काही माहिती उघड केल्यास निविदा प्रक्रियेस अडचण निर्माण होईल असे कृत्य करता येणार नाही.

**भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवे बाबत**

भ्रष्ट,फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणाऱ्या तसेच उपरोक्त आरोप असलेले व सदरची माहिती या कार्यालयापासुन लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अशा निविदाकाराची निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल.

**निविदाकाराच्या वाटाघाटीबाबत**

१) स्पर्धात्मक निविदा झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाटाघाटी केली जाणार नाही.

२) L-१ व्यतिरिक्त कोणत्याही निविदाकारासोबत वाटाघाटी केली जाणार नाही.

३) L-१ निविदाकारा बरोबर खालील परिस्थिती वाटाघाटी केली जाईल.

a. जर भरलेले दर असमर्थीनिय असतील किंवा प्रमाणापेक्षा जास्त असतील तर

b. जर निविदाकारांनी संघ ( कार्टेल) स्थापन केला असल्याचा संशय असेल तर

c. जर दुसऱ्यांदा निविदेस मुदतवाढ दिली गेल्यास निविदा प्रक्रियेत कमीत कमी तीन वैध व्यापारी निविदांचे मुल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर

सदरच्या वाटाघाटी निविदा समिती समक्ष करण्यात येतील.

४) दोन पेक्षा जास्त निविदाकार जर न्युनतम एक दरकारक ठरले तर त्या कंपन्याचा तीन वर्षाची टर्नओव्हरची बेरिज जास्त येईल त्या दोघामध्ये आदेश विभागुन देण्यात येतील.

अकुशल कंत्राटी मनुष्यबळ पुरविणे या बाबत संस्थानिहाय पदांची माहिती :-**तक्ता क्रमांक १**

| Sr. No. | Item Description | Item Qty | Qualification | Salary as per Minimum Wages Act. | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Multi task Worker | 1 | 10th Pass | 15500 | |
| 2 | Attendant | 30 | 10th Pass | 15500 | |
| 3 | Cleaning Staff | 30 | 10th Pass | 15500 | |
| 4 | Hospital Attendant | 5 | 10th Pass | 15500 | |
| 5 | Sanitry Attendant | 2 | 10th Pass | 15500 | |
| 6 | Support Staff | 35 | 10th Pass | 15500 | |
| 7 | Data Entry Operator cum Accountant | 4 | Commerce Graduation with 30 /40 Typing | 18000 | |
| | Total- | 107 | 0 | 111000 | |



Scanned with OKEN Scanner

अकुशल कंत्राटी मनुष्यबळ पुरविणे या पदाचे पदनाम व शैक्षणीक अहर्ता व अनुभव :- तक्ता क्रमांक २

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अहर्ता व अनुभव |
|---|---|---|
| अ | अकुशल | |
| १ | Attendant/ Guard | Must have passed SSC from a recognized Board and have knowledge of Hindi and Marathi language as well as experience in office work. |
| २ | Cleaning Staff | Must have passed SSC from a recognized Board and be physically fit as well as have knowledge of Hindi Marathi language and experienced person will be preferred |
| ३ | Support Staff | Must have passed SSC from a recognized Board and be physically fit as well as have knowledge of Hindi Marathi language and experienced person will be preferred |
| ४ | Multi task Worker | Must have passed SSC from a recognized Board and have knowledge of Hindi and Marathi language as well as experience in office work. |
| ५ | Sanitry Attendant | Must have passed SSC from a recognized Board and be physically fit as well as have knowledge of Hindi Marathi language and experienced person will be preferred |
| ६ | Hospital Attendant | Must have passed SSC from a recognized Board and have knowledge of Hindi and Marathi language as well as experience in office work. |
| ७ | Data Entry Operator cum Accountant | Must have passed Commerce Graduation with 30 /40 Typing as well as have knowledge of Hindi, Marathi and computer knowedge ,language and experienced person will be preferred |

अकुशल कंत्राटी मनुष्यबळ पुरविणे या पदाचे मानधनाबाबत. :- तक्ता क्रमांक ३

| अ.क्र. | पदनाम | मंजूर प्रतिमाह मानधन (रुपयात) | एकूण पदाची संख्या | एकूण मासिक मानधन | एकूण वार्षिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| अ | अकुशल | | | | |
| १ | Attendant/ Guard | 15,500/- | 30 | 4,65,000/- | 55,80,000/- |
| २ | Cleaning Staff | 15,500/- | 30 | 4,65,000/- | 55,80,000/- |
| ३ | Support Staff | 15,500/- | 35 | 5,42,500/- | 65,10,000/- |
| ४ | Multi task Worker | 15,500/- | 01 | 15,500/- | 10,86,000/- |
| ५ | Sanitry Attendant | 15,500/- | 02 | 31,000/- | 3,72,000/- |
| ६ | Hospital Attendant | 15,500/- | 05 | 77,500/- | 9,30,000/- |
| ७ | Data Entry Operator cum Accountant | 18,000/- | 04 | 72,000/- | 8,64,000/- |

अकुशल कंत्राटी मनुष्यबळ पुरविणे या पदाचे कामाचे स्वरुप व व्याप्ती, वेळापत्रक:- तक्ता क्रमांक ४

| अ.क्र. | पदनाम | कामाचे स्वरुप व व्याप्ती |
|---|---|---|
| ब | अकुशल पदे | |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| १ | Attendant/ Guard, Multi task Worker and Hospital Attendant | 1.To carry files, daks, official papers and books, etc. as an when required from office to residence office and vice versa of the officers to whom he is attached.<br>2. To attend to the office work (including carrying messages / orders) at the residence office of the officer to whom he is attached.<br>3. To attend to any other official duties which maybe assigned by the officer to whom he is attached. |
| २ | Cleaning Staff , Sanitry Attendant | • Cleans hospital patient rooms, baths, laboratories, offices, halls, and<br>other areas: Washes beds and mattresses, and remakes beds after dischage of patients. Keeps utility and storage rooms in clean and orderly condition. Distributes laundered articles and linens.etc |
| ३ | Data Entry Operator cum Accountant | 1. Collection of the reports from the field.<br>2. Data entry of the reports.<br>3. Compilation of the reports.<br>4. ministrial assistance like typing of letters and initaition of files and notes. |

- शासनाने ठरवुन दिलेल्या रुग्णालयीन वेळापत्रका प्रमाणे रुग्णालयामध्ये सेवा करणे आवश्यक आहे. तत्कालीन परिस्थितीनुसार संबधित **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव** यांच्या मान्यतेने सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा जिल्हयातील कोणत्याही आरोग्य संस्थेत उपयोगात आणू शकतील,अशा वेळेस प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. सदर सेवेत कुचराई अथवा असमाधानकारक आढळल्यास खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल व त्याची वसुली ठेकेदाराच्या देयकातून वसुल केली जाईल.

शास्ती/दंड आकारणी

अकुशल कंत्राटी मनुष्यबळ सेवेत कुचराई अथवा असमाधानकारक आढळल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने दंड आकारण्यात येईल व त्याची वसुली ठेकेदाराच्या देयकातून वसुल केली जाईल.

| | | |
|---|---|---|
| १ | In case delay in disbursement of salary. | The Contractor shall disburse salary to its deployed manpower inclusive of DA, if any, latest by 5th of every month, failing which penalty of Rs.200/per day will be imposed and penalty shall be capped at maximum ५% of bill generated of the month (Excluding GST).the contract shall liable to be terminated& Security Deposit / Performance Bank Guarantee shall be forfeited and Bank guarantee will be in cashed if salary will not disburse to employee within २ months of above stipulated time. Purchaser will have the power to appoint any other agency for the manpower services at the risk and cost of the Contractor. |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| २ | Supply of manpower | The Contractor has to maintain adequate number of manpower as per this contract and also arrange a pool of standby manpower / supervisor. If the required number of manpower is less than specified number as mentioned in the contract, a penalty of Rs.200/per absentee per day shall be deducted from the bill(s). Penalty shall be capped at maximum ५% of bill generated of the month (Excluding GST). Purchaser will have the power to appoint any other agency for the manpower services at the risk and cost of the Contractor. |
| ३ | If the employee is found responsible for disobedience/ misconduct | Warning/counseling/Immediate replacement within 2 days as decided by the buyer depending on the gravity of the act |
| ४ | If the employee is absent or takes leave for more than २ days without informing or taking prior approval. | Substitute within 2 days failing which, Rs-200 per day of the total value will be imposed and penalty shall be capped at maximum 5% of bill generated of the month (Excluding GST). |



Scanned with OKEN Scanner

रुग्णालयाकडून कंत्राट दारांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी :-

१. Materials required for unskilled workers, Necessary chemicals, cleaning equipment and necessary chemicals for cleaning staff.

२. To supply water for cleaning.

कंत्राट दाराकडुन कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या वस्तु :-

१) कंत्राटी कामगारांना गणवेश

२) ओळखपत्र.

३) स्वतःचा चालु मोबाईल फोन नंबर

अकुशल कंत्राटी मनुष्यबळ पुरविणे या सेवेचे सनियंत्रण :-

खालील सदस्यांची समिती सदर सेवेची गुणवत्ता पडताळणी दरमहा करतील.

१) **म. मुख्य कार्यकारी अधिकारी /जिल्हा आरोग्य अधिकारी/अति. जिल्हा आरोग्य अधिकारी/ माताबाल संगोपन अधिकारी/ तालुका आरोग्य अधिकारी/आरोग्यधिकारी मनपा/संबंधित वैद्यकीय अधिकारी/ एनएचएम प्रतिनिधी**

२) ठेकेदाराचे प्रतिनिधी

या शिवाय सदर कामाची पाहणी मंडळ,राज्यस्तरावरुन अचानकपणे केंव्हाही केली जाईल व त्याबाबतचे अभिप्राय नोंदविले जातील. तसेच असमाधानकारक बाबत समज देण्यात येईल. व कामात सुधारणा न दिसुन आल्यास ती कामे उपलब्ध अन्य एजन्सीकडुन/ ठेकेदाराकडुन / मनुष्याकडुन करुन घेऊन त्याचा पुर्ण खर्च ठेकेदाराच्या अनामत रकमेतुन वसुल केला जाईल. कंत्राटदाराच्या सेवा मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास त्या कुठल्याही क्षणी रद्द करण्याची शिफारस रुग्णालयीन प्रमुख यांच्याकडे करतील . अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेली हमी रक्कम / जमानतनामा रद्द करण्यात येईल.

